मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी,देखरेख व समन्वय समितीचे गठन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख:- १९ जानेवारी, २०१६

वाचा- १) शासन निर्णय क्र. स्मारक ३१०४/प्र.क्र.६७/२००४/२९ ,दिनांक २१ डिसेंबर,२०१५

प्रस्तावना:-

मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणीच्या अनुषंगाने संदर्भधीन दिनांक २१ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील प्रकल्प सनियंत्रण व अंमलबजावणी समिती रद्द करुन मा.श्री.विनायकराव मेटे, विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखालील संदर्भाधीन दिनांक २१ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या कार्यकारी समितीचे पुनर्गठन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे संदर्भाधीन दिनांक २१ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प सनियंत्रण व अंमलबजावणी समिती या अन्वये रद्द करण्यात येत आहे. तसेच मा.श्री.विनायकराव मेटे,विधानपरिषद सदस्य यांचे अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती गठण विषयक शासन निर्णय देखील रद्द करुनत्याऐवजी खालीलप्रमाणे अंमलबजावणी,देखरेख व समन्वय समितीचे पुनर्गठन करण्यात येत आहे.

१	मा.श्री.विनायकराव मेटे,विधानपरिषद सदस्य	**अध्यक्ष**
२	अपर मुख्य सचिव (र.व का.),सामान्य प्रशासन विभाग	**सदस्य**
३	अपर मुख्य सचिव (पर्यावरण),सामान्य प्रशासन विभाग	**सदस्य**
४	सचिव (बांधकामे),सार्वजनिक बांधकाम विभाग	**सदस्य**
५	सचिव (पर्यटन),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	**सदस्य**
६	सचिव (सांस्कृतिक कार्य),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	**सदस्य**
७	सचिव (नवि-२),नगरविकास विभाग	**सदस्य्**
८	आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका	**सदस्य**
९	पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई	**सदस्य**
१०	आयुक्त,मुंबई प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (MMRDA)	**सदस्य**
११	महाव्यवस्थापक,बेस्ट,मुंबई	**सदस्य**
१२	मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई	**सदस्य**

१३	व्यवस्थापकीय संचालक,सिडको	**सदस्य**
१४	सह पोलीस आयुक्त (वाहतूक),मुंबई	**सदस्य**
१५	संचालक,नागरी संरक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई	**सदस्य**
१६	संचालक, अग्निशमन दल,मुंबई	**सदस्य**
१७	प्राचार्य,जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,मुंबई	**सदस्य**
१८	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट् राज्य,मुंबई	**सदस्य**
१९	अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई	**सचिव**
२०	भारतीय नौदलाचे प्रतिनिधी	**सदस्य**
२१	तटरक्षक दलाचे प्रतिनिधी	**सदस्य**
२२	मुख्य अभियंता,मुंबई (सां.बा.),प्रादेशिक विभाग,मुंबई	**सदस्य सचिव**

२. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल --

१) स्मारकाच्या बांधकामाचे नियोजन व त्याच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच विविध क्षेत्रातील उदा.आराखडा व संकल्पचित्र,सुरक्षा,वाहतूक,आपत्कालीन व्यवस्थापन, स्मारक उभारणी या बाबींवर देखरेख करणे व मार्गदर्शन करणे, व आवश्यकतेनुसार प्रस्ताव मंजूरीसाठी उच्चस्तरीय सुकाणू समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे.

२) स्मारकाच्या उभारणीबाबत आवश्यक त्या परवानग्या घेणे व त्यांच्या अटींची पूर्तता करणे

३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामावर देखरेख व समन्वय ठेवणे

४) स्मारकाच्या उभारणीबाबत आवश्यक त्या विविध निविदा प्रक्रियेवर सनियंत्रण करणे, तसेच त्यांच्या अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव शिफारशींसह उच्चस्तरीय सुकाणू समितीस सादर करणे.

५) स्मारकाच्या उभारणीत तांत्रिक किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमी विषयक आवश्यक असेल तर किरकोळ बदल व सुधारणा करणे.

६) स्मारकाच्या सुरक्षेबद्दल व आपत्कालीन व्यवस्थेबाबत उच्चस्तरीय सुकाणू समितीला शिफारस करणे

७) स्मारकाचे भूमिपूजन, उदघाटन व वेगवेगळया वेळी पुढील काळामध्ये विविध कार्यक्रमांच्या आयोजनांचे नियोजन व समन्वय करणे.

८) स्मारकाची दैनंदिन देखभाल, दुरुस्ती व जतन करण्यासाठी पर्यटकांकडून वसूल करावयाच्या शुल्काबाबत अंतिम निर्णय घेणे.

९) सदर समिती आवश्यकतेनुसार या प्रकल्पाच्या सुरु असलेल्या कामकाजाचा सर्वसाधारण आढावा घेईल.

१०) समितीस आवश्यक वाटल्यास इतर विभागांचे सचिव किंवा इतर अधिकारी व विविध क्षेत्रातील विशेषज्ञ यांना आमंत्रित करण्याचे व गरजेनुसार सल्लागार नियुक्ती करण्याचे अधिकार समितीला असतील.

११) समितीच्या दैनंदिन कामकाजाकरिता स्वतंत्र कार्यालय असेल.

१२) संचालक,पुराभिलेख,कला संचालनालय, सांस्कृतिक संचालनालय यांचेशी समन्वय साधून अस्त्र,शस्त्र,अवजारे,ग्रंथ,पुस्तके,रोजनिशी,छत्रपती शिवाजी महाराज व इतिहासाशी संबंधित बाबी इत्यादी संग्रहालय उभारण्यासाठी एकत्रित करणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१७३९२३५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravikant Ganpat Panchal

Digitally signed by Ravikant Ganpat Panchal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4d632f688a5def40e348dd4096560792e82ea8b6c44eb75bc50ebc2af6045a7c, cn=Ravikant Ganpat Panchal
Date: 2016.01.19 17:40:31 +05'30'

(र.ग.पांचाळ)
अवर सचिव

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई,
३) मा.श्री.विनायकराव मेटे,विधानपरिषद सदस्य
४) अपर मुख्य सचिव (र.व का.),सामान्य प्रशासन विभाग
५) अपर मुख्य सचिव (पर्यावरण),सामान्य प्रशासन विभाग
६) सचिव (बांधकामे),सार्वजनिक बांधकाम विभाग
७) सचिव (पर्यटन),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
८) सचिव (सांस्कृतिक कार्य),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
९) सचिव (नवि-२),नगरविकास विभाग
१०) आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका
११) पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
१२) आयुक्त,मुंबई प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (MMRDA)
१३) महाव्यवस्थापक,बेस्ट,मुंबई
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई
१५) व्यवस्थापकीय संचालक,सिडको
१६) सह पोलीस आयुक्त (वाहतूक),मुंबई
१७) संचालक,नागरी संरक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
१८) संचालक, अग्निशमन दल,मुंबई
१९) मुख्य अभियंता,मुंबई (सां.बा.),प्रादेशिक विभाग,मुंबई
२०) प्राचार्य,जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,मुंबई
२१) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ,महाराष्ट् राज्य,मुंबई
२२) अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई
२३) भारतीय नौदलाचे प्रतिनिधी
२४) तटरक्षक दलाचे प्रतिनिधी
२५) निवडनस्ती/का-२९.